Mahalingaswami Kashikar
Sabdodha paddavali
सद्बोध पद्यावलि ॥
Sanskrit
Paper – Printed (form of Books)
1929 San (89 years old)
46 folio
6.5" × 4.2"
Complete

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्येभ्यो नमः

श्रीमज्जद्गुरुपंचाचार्य प्रासादिक प्रबंधमाला.

चतुर्थ पुष्प.

सद्बोध पद्यावलि.

प्रकाशकः—

श्रीमहालिंगस्वामी काशीकर.

जंगमवाड़ीमठ काशी.

[प्रथमावृत्ति.]

किंमत २ आणे.)   सन १९२९ ई.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्येभ्यो नमः

श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्य प्रासादिक प्रबंधमाला.

चतुर्थ पुष्प.

सद्बोध पद्यावलि.

प्रकाशकः—

श्रीमहालिंगस्वामी काशीकर.

मुद्रकः—

बी. एल. पावगी

हितचिन्तक प्रेस, रामघाट, काशी.

[प्रथमावृत्ति.]

किंमत २ आणे)   (सन १९२९ इ.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रकाशकाचे दोन शब्द.

आस्तिक लोंक ईश्वराचीप्राप्ति होण्या करितां विविधमार्गानें शिवोपासना करीत असतात त्या प्रमाणेंच परमपवित्र अशा वीरशैवांनाही आपले शक्तिविशिष्टाद्वैतमतसंस्थापकश्रीजगद्गुरु पंचाचार्यांच्या गुणानुवादस्तवनानें इह पर साधण्यास सुलभ व्हावे एवढ्या करितां अनेक कवीनीं रचलेलीं पदें या लहानशापुस्तकांत संग्रह करून छापविलीं आहेत तसेंच महाराष्ट्रीय वीरशैव बांधव शिक्षणाच्या बाबतींत फार मागासलेले असल्यामुळें त्याना ह्या गाढनिद्रेंतून जाग्रत करण्या साठीं "श्रीयुत सदानंद बुवा कीर्तनकार जोडजवळेकर" यांनीं जीं विद्येविषयीं पदें रचिलीं आहेंत तींही या पुस्तकांत छापविलीं आहेत. या सर्वांचा समाज बांधव योग्य फायदा घेतील अशी आशा आहे.

या पुस्तकाच्या छपाईचा सर्वखर्च गुरुभक्त शिरोमणी "श्रीसंत गुरुदास आप्पा पाटील" सांकोळकर यांनीं उदार अंतःकरणानें देऊन गुरुकार्यास साह्य केले या बद्दल श्रीगुरुचरणीं त्यांचे अभिष्टचिंतन करून अन्य समाज बांधवांना ही अशीच सद्बुद्धि देण्यास ईशचरणीं प्रार्थना करीत असो !

आपला

श्रीमहालिंग स्वामी काशीकर.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्येभ्यो नमः ।

काशी ज्ञानसिंहासनाधीश

श्रीमद्विश्वगुरुविश्वाराध्यावतार.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ॐ

श्रीमज्जगद्गुरुपञ्चाचार्येभ्यो नमः

सद्बोध पद्यावलि.

पद. १ ले.

(चाल. तोपे वारनारे वारिजा०)

पूजयध्वंरे मनुजाः पूजयध्वंरे । श्रीजगद्गुरुपंचाचार्यान् ।। धृ० ।। राजराजसंपूजित चरणान्। राजराजिसंकीर्तितचरितान् । स्त्रर्जनविनुतान् सज्जनविनतान् ।। १ ।। पंचलिंगप्राप्तजननान् । पंचसूत्रसंबोधिततत्वान् । पंचपंचाक्षरमनुबोधान् ।। २ ।। वीरनंदिभृंगिवृषभस्कंदगोत्रप्रवरनाथान् । कारुण्योद्धृतकाशीनाथान् ।। ३ ।।

(काशीनाथ कविकृत)

पद २ रें.

(चा. मोहन राग.)

श्रीजगद्गुरुपंचाचार्यान् । नैजभक्तभव, भूजकुठारान् ।। धृ० ।। शक्तिविशिष्टाद्वैतस्थापन शक्तान्

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

परमविरक्तान् वन्दे ॥ १ ॥ चतुराश्रम शुभगति विधायकान् । ख्यात षट्स्थल कारण भूतान् ॥ २ ॥ भंगितदुष्टप्रसंगान्महिमो । त्तुंगान् वृषभलिंग विनमितान् ॥३॥

(वृषभलिंग कविकृत)

पद ३ रें.

(चाल. पाहि परशिव पावनात्मक)

पाहिरेणुक पा हिदारुक पाहिएकोराम भो । पाहि पंडिताराध्य विश्वाराध्य पाहि मां सदा ॥ धृ० ॥ कुंभसंभव मुख्यमुनितति । शंभुतत्वविबोधक । सांबसद्योजातनिर्गत । कंबुपात्रविराजित ॥ १ ॥ देवनंदन मुख्यनृपगण । सेव्यमानपदांबुज । देव दानवमानवावन । भावयुक्तमनोंबुज ॥ २ ॥ गौतमेंद्रनृपालनामक । सार्वभौमोद्धारक । ख्यात व्यासमुनीशपालक । भूतिसद्गतिदायक ॥ ३ ॥ मल्लिकार्जुनलिंगसंभव । मल्लिकोज्ज्वलविग्रह । क्षुल्लकाद्रिपवे प्रभामय । क्षुल्लयामलचिद्गृह ॥ ४ ॥ श्रीशमुखसुरसंघसेवित । भासुरेशानोदय । भासकाशीनाथकविदय । पाशनाशशमालय ॥ ५ ॥

(काशीनाथ कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ४ थें.

जयतादिम पंचाचार्याः। प्रतियुगमखिलां क्षिति मुद्धर्तुं। ज्योतिरूप लिंगोद्भूता देशिकवर्याः ॥ १ ॥ अवतरणंवो भुवनोद्धरणं। भवतां चरणं भवभयहरण-मवार्याः॥२॥ भृत्य सदाशिव नित्य संविनुता। यत्यधि-नाथ संस्तुत्याः श्री शिवाचार्याः ॥ ३ ॥

(सदाशिव कविकृत)

पद. ५ वें.

श्रीगुरुरेवण, श्रीकंठधारण, श्रीकांतकारण। ॐ ॐ ॐ ॥धृ०॥ पाहिपाहि फालेक्षण, दुष्टौघाशिक्षण, शिष्टौघ रक्षण कष्टौघतक्षण। ॐ ॐ ॐ॥ १ ॥ कुंभसंभव पूजित, रंभापुरीस्थित, रंभादिसंस्तुत, सांबास्यनिर्गत। ॐ ॐ ॐ ॥२॥ विश्व विश्वदयाकर, अश्वत्थदंडधर, शाश्वतशुभ-कर, ईश्वरशक्तिधर। ॐ ॐ ॐ ॥ ३ ॥ वीरगोत्रा-धिनायक वरप्रदायक, गुरुत्वदायक, गुरुत्वकायक। ॐ ॐ ॐ ॥ ४ ॥ काशीनाथ कृपाकर, आकाशमार्गचर, लोकेशशंकर, दुष्पाशसंहर। ॐ ॐ ॐ ॥ ५ ॥

(काशीनाथ कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ६ वें.

(चा. झुंजोटि राग-आदिताल)

श्रीरेणुकं-भ्राजकं-भजे-कृपा-कारकं ॥ मागारिसा नीधपाधसारिरीसारिग । देवकुलफलकं प्रमथतिलकं ॥ मागरिसगरिमा रिगसरिगमा ॥ विबोधकं विशोधकं विमोहक विचारकं ॥ मगामपा मपाधपा मनीधपा मगा-रिगा ॥ श्रीनिगमानिकरमनुविनुतं यतिपतिततिनुतच-रितं ॥ मामगमरिगसरिगरिगमा धपमपधपमगमपमा ॥ पुरहरपूजननिरतं । यमनकलितं कुमनगलितं ॥ पधनिधनीधपधपमा । धपमगरिमा पमगरिगमा ॥ श्रीविरतिमिलितं विरतललितं विधृतगुरुतं त्रिहृत । मानिधपमगमा धपमगरिमा पमगरिगमा गरिस । जरतं शमितं । दमितं । शिवतं । शुभतं ॥ रिगमा । गरिमा । रिगमा । धपमा ॥ पधमा ॥ सुरगण भरितं । मरण रहितं ॥ निधधपमगमा गरिसरिगमा ॥ १ ॥

(काशीनाथ कविकृत)

पद. ७ वें.

चा. (होई विजयी तूं रंभे०)

गुरो श्रीरेणुकशिवकर सोमेशजनताघहरण पाहि । प्रमथसार्वभौम ॥ धृ० ॥ पावनात्मक । शिवमुक्ति-

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

दायक । शिवतत्वबोधक । भवरोगनाशक । श्रीविरक्त देशिक ॥ गुरो० ॥ बुधविकाश । विदलिताश । मदन- नाश । निधनसदनदलनभास । विधिहरींद्रपोष ॥ १ ॥ कुंभजानत । वररंभापुरीवृत । निरालंबगणनुत । सुर- शांभवार्चित । श्रीहरीशसेवित ॥ गुरो श्री० ॥ निगम विनुत । सुगुणभरित सुगतविमत । गगनगमन शमन- कलित । योगिनिकरनाथ ॥ २ ॥

(हरीश्वर कविकृत)

पद. ८ वें.

(चा. जगदात्मक श्रीरघुवररामा.)

जगदाचार्य भो रेणुकदेव । मृगकररूपविभो परि- पाहि ॥ ध्रु० ॥ पावनकाय । पावकलोचन । कोविद संचयदेव महीज ॥ १ ॥ चोळधरेंद्र । पाल महायति । जालललामसु । शील गणेश ॥ २ ॥ देशिकवर्य । भासुर शमिपुर । वाससुरेशक । वीशसुपोष ॥ ३ ॥

(अमरनाथ कविकृत)

पद. ९ वें.

(चा. आनंदाचाकंद०)

गानानंद सुरानत निरुपम । रेणुकगुरुवरपालया ॥ दीनानांराड् भूनुत सुखकर रेणुक० ॥ १ ॥ भिक्षापेक्ष

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जिताक्ष परमरुद्राक्षविभूषित कंधर ॥ दीक्षा शिक्षा मोक्षाग्रेसर रेणुक० ॥ २ ॥ भासुरशामिपुर वासमुरेशक वीशनुतांघ्रिकुशेशय ॥ आशापाशक्लेशविनाशक रेणुकगुरु० ॥ ३ ॥

(अमरनाथ कविकृत)

पद. १० वें.

भज त्रिजगदाराध्य श्रीरेणुकं भज ॥ कुंभजादि मुनिपनुतं । जंभभेदिसुरगणनुतं । शांभवपद भक्तियुतं ॥१॥ कुटिलसिद्धगर्वहरं । पटुतर स्मर दर्पहरं । जटिलि मुंडि यतिपगुरुं ॥ २ ॥ वीरभद्र गोत्रपतिं, वररंभापुरीपतिं । पुरगिरिचर बालपतिं ॥ ३ ॥

(चिद्घन कविकृत)

पद. ११ वें.

(चा. जयकृष्णातट निवासा०)

जयगुरुरेवणसिद्ध । भयहर तापसवृद्ध । लयकर शिवरतिबद्ध ॥ धृ० ॥ सिद्धसमूहविशुद्ध । बौद्ध मतादिविरुद्ध । शुद्धजनावलिश्रद्ध ॥ १ ॥ परशिव-मुखसंजात । परतर भसित सुपूत । विरताकर परिवीत

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ २ ॥ पाशावलिपरिनाश । क्लेशद्विपपंचास्य । काशी-
नाथविकाश ॥ ३ ॥

(काशीनाथ कविकृत)

पद. १२ वें

(चा. पांडुनृपति जनकजया.)

रेणुकगुरुराज जय । स्थाणुरूप गुणनिलय । आणवादिमल विलय । प्रणवमय विभो ॥१॥ सोमनाथ लिंगभव । सोमशांत भंग भव । प्रमाकांत तुंगशिव । प्रमथ पुंगव ॥ २ ॥ क्लेशराशिनाशकर । देशिकेश वरदकर । काशीनाथपाशहर भासचरवर ॥ ३ ॥

(काशीनाथ कविकृत)

पद. १३ वें.

(चा. प्रभो विभो अगाध०)

श्रीरेणुकेश्वर भो मे । मंगलं देहि गुरुराज ॥धृ०॥ सोमेशलिंगजात । नमितार्तिनाशपूत । रमणीयपावनचरित । दममुख्यगुणगणभरित ॥ १ ॥ वेदागमादि विनुत । विधिमुख्य सुरकुलनमित । मदमोहमत्सररहित । बुधवृंद कीर्तितचरित ॥२॥ श्रीवीरशैवनिलय नवनीतकोमलहृदय। शिवरूप जितघनमाय।कवि श्रीहरीश्वरगेय।।३॥

(हरीश्वर कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. १४ वें.

(चा. अर्जुनि उमज तरी.)

जयगुरु रेवणदुरितविद्रावण । जय गगनप्रयाण जगदवनधुरीण ॥ ध्रु० ॥ चरणस्मरणरतभरण परायण । हरयोगनिद्रण परतरशिवभ्रूण ॥ १ ॥ खर्पर घनतर दर्पविदारण । दर्पकविभंजन कर्पूरांगविश्राण ॥ २ ॥ सदयहृदयचिदभ्युदयानिषेवण । पदस्तवनप्रवीण सदाशिवसुप्रवण ॥३॥

(सदाशिव कविकृत)

पद. १५ वें.

जय जय रेणुकार्य भो । माननिधे रंभानगरालय । ॥ ध्रु० ॥ सद्गुणभूष जगद्गुरुवर्य जरद्गववाहनरूप-विभो । चिद्घनसद्गणहृद्घनमंदिर ॥ रेणुकार्य भो० ॥१॥ दिग्वसनानिल भुग्वारवर स्रग्वंशस्थापकगुरुराट् । वाग्वर वाग्वर दिग्वर वंदित ॥ २ ॥ भासुर शमिपुर वास सुरेशकवीशनुतांघ्रि कुशेशय भो ॥ दोषविनाश विशेषविचक्षण ॥ ३ ॥

(अमरनाथ कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. १६ वें.

(चा. सीसाधरन गंगा भस्म) चा. मूर्तिमंतभीति०

दारुकेश धीरकाश । मारनाश भो वीरशैव धर्मपोष । पाहि शिववृष ॥ धृ० ॥ दृष्टिसूत्रकार धीर । शिष्टगुरुवर ॥ दुष्टवृंदहृदयदार । कष्टपरिहर ॥१॥ नंदिगोत्रनाथपूत । नंदिरथरत ॥ चंद्रशेखरास्यजात सांद्रगणवृत ॥ २ ॥ क्लेशमूलशोषशील । भासहतमलं । काशीनाथवालपाल । पाशुपतकल ॥ ३ ॥

(काशीनाथ कविकृत)

पद. १७ वें.

(चा. सुलभमनि गणानभूपसुता०)

परमगुरु वरेण्य, पाहिसदा । चरवर दारुक देवमुदा । गुरुवरेण्य पाहि सदा ॥ धृ० ॥ नतमंदार यतिकुलशेखर । क्षितिपालकोद्धार ॥ १ ॥ भुवनाधार । शिवपूजापर । भवतापसंहार ॥ २ ॥ पातकदूर । पूतकलेवर । भूपाधिपाकर ॥ ३ ॥ उज्जयिनीश । सज्जनलालस । चिज्ज्योतिःसंकाश ॥ ४ ॥ शमिपुरनाथ । सुमनोवरनुत । विमलांघ्रिकंजात ॥ ५ ॥

(अमरनाथ कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. १८ वें.

(चाल. आयि आयि कारिव्रदरि०)

विराजदेकोरामगुरुंभज । राम गुरुं भज, राम गुरुं भज। मूढमते हृदि ॥ धृ० ॥ गणवरवेषं । गुणमणिभूषं । जानिमृतिनाशं ॥ रामगुरुं० ॥१॥ धूतविकारं । पातकदूरं । पूतशरीरं । रामगुरुं भज ॥ २ ॥ पुरहरसूनुं । नरसुरधेनुं। करघृतवेणुं। रामगुरुंभज ॥३॥ श्रुतिततिवेद्यं। रतिपतिहृद्यं । क्षितिपाराध्यं । राम गुरुं भज० ॥४॥ चरचक्रेशं । विरताधीशं । सुरकान्तिकाशं । राम० ॥५॥

(अमरनाथ कविकृत)

पद. १९ वें.

(चा. तोपेवारनारे वारी.)

जयजय एत्रोराम । भयलय योगिराम ॥ धृ० ॥ गणपति गीष्पति-गोपति-विबुध । श्रीपति वाक्पति नुतकीर्ते ॥ भापति भूपति नताशिवमूर्ते ॥ १ ॥ गतरति यतिपति सुरपतिपरमश्रुतिततिसंस्तुतविरति रते ॥ चरतति कृतनूतिरतयुत भूते ॥ २ ॥ श्रीधर भूधर मंदिर श्रीकर शंकर संव्टत केदार ॥ किंकर काशीनाथ कृपाकर ॥३॥

(काशीनाथ कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. २० वें.

एकोराम जयगुरुराम ॥ रामेशलिंगविराम ॥धृ०॥ रामादिवंदितपाद ॥ सोमादिसंस्थितमोद । सामादिवेदबोध ॥ १ ॥ वैराग्यपीठाधीश, वैराग्यसंपत्कोश ॥ सौभाग्यकारणेश ॥ २ ॥ भुवनालिपालनलोल । कविजालकीर्तितलील । कविकाशीनाथ पाल ॥ ३ ॥

(काशीनाथ कविकृत)

पद. २१ वें.

(चाल-राग हिन्दुस्थानी भैरवी०)

जय भो जगद्गुरो एकोरामार्य । जय जय मायाध्वांत सूर्य । एकोरामार्य ॥ धृ० ॥ विरतप्रवरार्चितपदपद्म ॥ सुरचिरहिमवद्गिरिवरसद्म ॥ १ ॥ पूतजनाभीष्टप्रदराम ॥ नाथलिंग संभवहतकाम ॥ २ ॥ तावक सेवक संगम देशिक ॥ भाव भरित परिहृत भवशोक ॥ ३ ॥

(संगमेश्वर पट्टस्वामीकृत)

पद. २२ वें.

पंडित देशिक, ब्रह्मांड भासक ॥ पंडित तिलक

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पाहि ॥ धृ० ॥ नरलोक, सुरलोक, हरलोक, पालक । ॥ १ ॥ शिवजात, शिवपूत, कविगीत, श्रीयुत ॥ २ ॥ हृतकाल, धृतशील, वृतशालि, श्रीशैल ॥ ३ ॥

(काशीनाथ कविकृत)

पद. २३ वें.

(चा. हे मुकुंद मुरहरि गोविंद०)

भोगणेंद्र पंडितयोगींद्र गुणसांद्र पाहि शमितोपेंद्र ॥ धृ० ॥ भूरिमहिमा, गार भीमा, कार नतदेवद्रुम, धीरकाम, दूरसोम, सारकलाधर निस्सिम ॥ १ ॥ वार्धितपर, वादिनिकर, श्रीदसखपूजापर । खेददूर, वेदसार, बोधकरार्णव गंभीर ॥ २ ॥ वृषभवंश, रसाधिपेश, रसिकजनतामानस । बिसजवास, पशुपवेष, लसितशमीपुरसुरपोष ॥ ३ ॥

(अमरनाथ कविकृत)

पद. २४ वें.

(चा. शशिसूर्य प्रभागगना०)

जय जय जगद्गुरु पंडिताराध्य । त्रियुगलस्थलबोध्य ॥ धृ० ॥ भक्तजनगण, मुक्तिप्रदाना, सक्त विरक्तोद्धरण ॥ १ ॥ हार तुषार, गौरशरार । सार महिमा

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

धार ॥२॥ तुंग चिद्रूपा, नंग दुराप, संगमहृद्दीप॥ ३ ॥

(संगमेश्वर स्वामीकृत)

पद. २५ वें.

(चाल. गोपाल गिरिधर०)

जय पंडिताराध्य । जय सुगुणसाध्य । जयचित्प्र-भाहृद्य । जय वेदततिवेद्य ॥ धृ० ॥ अहरहः स्फुरद्देह । दहितप्रखरमोह । महितश्रीगिरिगेह । प्रहतरिपुसंदोह ॥ १ ॥ अमित शमनिक्षेप । शमितत्रिविधताप । दमितेंद्रिय प्रताप । प्रमथेश स्वरूप ॥ २ ॥ संगमलमत्सुगम-संगीत श्रुतिप्रेम । मंगलमयानुपम । लिंगयोगविराम ।३।

(संगमेश्वरस्वामी कविकृत)

पद. २६ वें.

(चा. पानीय भरन०)

काशीनिवास गुरुविश्वाराध्य पाहि ॥ गुरुविश्वा-राध्य पाहि ॥ धृ० ॥ विश्वाधिनाथ, विश्वेशजात । विश्वपुनीत ॥ गुरु० ॥ १ ॥ अमितचरेग नमितयतीश । शमित रतीश । गुरु० ॥ २ ॥ भासुर शमिपुर । वास सुरेशम । नीषिविनुत । गुरुविश्वाराध्यपाहि ॥ ३ ॥

(अमरनाथ कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. २७ वें.

(चा. अर्जुनि उमज तरी सगुण०)

जयगुरु नायक, जय वरदायक । जय चरपालक, जय हरबालक ॥ धृ० ॥ विश्वनाथोद्भव, विश्वप्रकाशक । विश्वाराध्य देशिक, विश्वदुःखद्रावक ॥ १ ॥ दुरित विदारक, हरमतस्थापक । स्मरमदनाशक । शरणजनोत्सुक ॥ २ ॥ ज्ञानपीठेश्वर, ज्ञानरत्नाकर । जननमरण-हर, जनघन सुखकर ॥ ३ ॥

(हरीश्वर कविकृत)

पद. २८ वें.

(चा. मजा क्या देते है यार०)

पंचास्य पंचाचार्या, मंगलं कुरुत गुरुवर्याः ॥धृ०॥ ब्रह्मांड भुवनाचार्याः । पिंडांडशोधन कार्याः ॥ पाखंड खंडन धैर्याः । पांडित्यमंडितवीर्याः ॥ १ ॥ धृतवेद-वेद्यलिंगाः । कृतभक्त पापभंगा ॥ हृतपंचबाणसंगा । वृतशिष्यरत्नसंघाः ॥ २ ॥ कालादितत्त्वाहरणाः । फालाक्षदाहकिरणा ॥ मलभारबाधिततरणाः । फलकामिशंकरकरुणाः ॥ ३ ॥

(शंकर कविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीयुत सदानंद बुवा कीर्तनकार जोड-जवळेकर यांनीं रचलेलीं पदें.

पद. २९ वें.

(चा. गुरुराज मावली ये०)

जय जय पंचाचार्य गुरुवरा ॥ करी मम वस्ति हृदय मंदिरा ॥ धृ० ॥ शंभुमुखोद्भवा स्वामि दयानिधी ॥ धांवुनि मज उद्धरा ॥ १ ॥ शिवभक्तिस्थापका धन्य जगद्गुरु ॥ आधार योगीश्वरा ॥ २ ॥ पतितोद्धारक ऐकुनि आलो ॥ तारा मज पामरा ॥ ३ ॥ मंगलमय प्रभु जगदुद्धारा ॥ पदिं आश्रय द्या किंकरा ॥ ४ ॥ सदानंद हा भाकित करुणा ॥ प्रेमें पालन करा ॥ ५ ॥

पद. ३० वें.

नमन असो त्या गुरुपदकमला ॥ शंभुमुखोद्भव आचार्याला ॥ धृ० ॥ नंदि भृंगि वीर वृषभ ॥ स्कंदादिहीं गोत्रें ज्याला ॥ १ ॥ लिंग रुद्राक्षा धारण करिती ॥ भस्में शोभविलें भालाला ॥ २ ॥ वीरशैवमत स्थापन करुनि ॥ पावन केलें या जगताला ॥ ३ ॥ पंच पीठाधीश जगद्गुरु ॥ मंगल कीजे मम कार्याला ॥४॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सदानंद हा चरणीं लोळे।। पावन कीजे या दासाला।।८।।

पद. ३१ वें.

(चा. शिव स्वरूप तुम्हीं०)

वीरशैवांनों करितो विनंती जोडुनि दोन्ही करा।। आमुच्या वचना हो ऐका जरा ॥ १ ॥ आश्रय हीन आम्हीं दीन बालकें पदरीं घ्यावें जरा॥ विद्यामृतपाना करा ॥ २ ॥ चा. ।। तुम्हीच आमचे पालन कर्ती माता॥ तुम्हीच आमुचे अन्न दाते पिता ।। तुम्हीच आमुचे बंधु भगिनी, नाहीं कोणी दुसरा ।। विद्या अमृत पाना करा ॥ ३ ॥ सांगा सुजन हो शरण जावे कोणा ॥ गुरुवर आम्हाकडे पाहिना ।। सदानंद हा करित प्रार्थना ॥ निश्चय करुनी पुरा ।। विद्यामृत पाना करा ।। ४ ।।

पद. ३२ वें.

(चा. सुवर्ण केतकी.)

वीरशैव हो ऐका ऐका बाळांची करुणा ।। दीन बालकें विनविती प्रेमें नका त्यजूं त्यांना ।। १ ।। स्वधर्म आपुला रुष्ट होऊनि गेला कीं वना ।। विद्या मातेचे साह्य घेऊनी आणा परत सदना ।। २ ।। विद्याहीन

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हो झालों म्हणुनी करिती अपमाना ॥ भोंदू फसवे बुडवुनि आपणा उडविति किती चैना ॥ ३ ॥ यास्तव आतां विद्या दान द्या समाज वाळांना ॥ वेषधारी चैनीं द्रव्य नका देऊ त्यांना ॥ ४ ॥ सदानंद हा बद्ध अंजली भाकितसे करुणा ॥ समाज वाळें आपुलीं मानुनि द्या विद्या दाना ॥ ५ ॥

पद. ३३ वें.

(चा. पोवाड्याची.)

वीरशैव बंधुनो जाग्रत व्हाया करितो प्रार्थना ॥ शौर्याची ती ध्वजा उभारा देऊनि विद्या दाना ॥ १ ॥ विद्येनंचि लक्ष्मी प्राप्ति, विद्येनेंचि ज्ञाना ॥ विद्येनेंचि धर्मजाग्रती, राजसभें माना ॥ २ ॥ विद्यामाता विद्या-पिता, आधार सर्वांना ॥ विद्या हीन ते धुळीस मिळले पावुनी अपमाना ॥ ३ ॥ यास्तव तुम्ही विद्यादान द्या समाज वाळांना ॥ जगीं धन्यता मिळवुनी घ्या हो सत्य मनीं आणा ॥ ४ ॥ जैन मराठे बंधु आपले किती करिती यत्ना ॥ जगीं धन्यता देऊनी त्यांचे संगतीस जानां ॥ ५ ॥ सदानंद हा करित विनंती समाज

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बंधूंना ॥ द्वेष सोडुनी विद्ये साठीं ऐक्य तुम्ह
व्हाना ॥ ६ ॥

पद. ३४ वें.

(चा. मदांधे.)

तुम्हांवीण ते जगती आम्हां कोणी नाहीं। तुम्हीच आमुचे तात माता बंधु पाहि ॥ तुम्ही पाजा विद्यामृता तुम्हीच करा पालन आमुचे स कांहीं ॥ १ ॥ विद्याऽऽर्थी द्यावे दान आम्हां कांहीं। स्वकीय माता पिता आम्हां पुसत नाहीं ॥ यास्त तुम्हां शरण आलों दीन बालें ठेवि तुमच्या चरण डोई ॥ २ ॥ सांगा आतां जावे आम्हीं कोण्या ठायीं। हृढ़मीठी दिली आतां तुम्हां पायीं ॥ सदानंद सांगे स दीनबालें प्रेमे करूनि धरा हृदयीं ॥ ३ ॥

पद. ३५ वें.

(चाल. छक्कड़.)

साऱ्या जगांत फिरूनि फायिल हो विद्ये वां चोनि सुख नाहीं वायल ॥ धृ० ॥ बघा विद्वानाला। राजसभे गेला ॥ मान देतिं त्याला ॥ नांव घेति

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्याचे आदि पहिल ॥ १ ॥ विद्या ज्याचे पासी ॥
गोंडा घोळति त्यासी ॥ धन पाया पासी ॥ थोरा
मोठ्यांनीं आणून वाहिल ॥ २ ॥ बघा सावका-
शला ॥ विद्वान घरा आला ॥ लोड तक्रिया दिला ॥
हात जोडून पुढे उभं राहिल ॥ विद्ये वांचून सुख
नाहीं वायल ॥ ३ ॥ आणखी ऐका थोडे ॥ पहा
शास्त्राकडे ॥ तेहि झाले वेडे ॥ विद्या मातेचे गुण
त्यांनीं गायील ॥ वि० ॥ ४ ॥ मोठे साधू भारी ॥
फिरती वनांतरी ॥ होऊनी दिगंवरी ॥ ब्रह्म विद्येसी
मन त्यांनीं वाहिल ॥ विद्ये० ॥ ५ ॥ विद्यामाता
भारी ॥ जो कां हृदयधरीं ॥ त्याचे प्रेम भारी ॥
सदानंदाच्या मनांत राहिल ॥ विद्ये० ॥ ६ ॥

पद. ३६ वें.

(चा. नमन असो त्या.)

नमन असो हो सद्गुरु चरणा ॥ विद्या दाना
करिती त्यांना ॥ धृ० ॥ समाज वाळा आश्रय देती ॥
तया साठीं जे देह झिजाविती ॥ रात्रंदिन नच चैन कीं
ज्यांना ॥ १ ॥ ऐशा वरुनि ओंवाळुं काया नित्य लोळूं
त्यांच्या पाया ॥ सर्वगुरुहुनी श्रेष्ठ की माना ॥ २ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

या देहाच्या करुनि पादुका ॥ अर्पण करितां न्यून्य कीं देखा ॥ स्तुती न करवे धरिले मौना ॥ ३ ॥ सदानंद हा विनवी सर्वां ॥ अशापरी तुम्हीं गुरुपदीं शिरवा ॥ नाहीं नमन दुजिया चरणा ॥ ४ ॥

पद. ३७ वें.

(चा. जा जा जा गुरु.)

तोची तोची तो सद्गुरु पहा ॥ समाज बाळां आश्रय देई सोसुनि कष्टमहा ॥१॥ पिठाधिकारी झिजती अशापरी कोंदणांत हीरा ॥ चैनी माजी गुंतले जरि, तरी चिखलांतील गारा ॥ २ ॥ सदानंद हा विनवी *गुरुवरां तुम्ही शुद्धहीरा ॥ चैनीमाजी गुंतुनी वावा नका होऊं गारा ॥ ३ ॥

पद. ३८ वें.

(चा. मी नारी नराची०)

समाज माते धांवुनि येई, पदरीं घेई, आश्रय देई, ह्या दीन बाळांना ॥ दीनस्वरें करुनि या विनवितो ॥ धृ० ॥

---

* या ठिकाणीं कवि आश्रमधर्मा प्रमाणें न वागणाऱ्या गुरुवर्गास अनुलक्षून म्हणत आहे.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मातेनें जरी निष्ठुर व्हावे ॥ तरी बाळें कोणाकडे जावे ॥ कोणी त्यांचे लाड पुरवावे ॥ अंकीं बसावे कोणाच्या ॥ १ ॥ येऊं द्या आम्हां बाळांची करुणा ॥ नका नका धिःक्कारू त्यांना ॥ द्या हो द्या विद्या दाना ॥ प्रेम अंतरीं धरुनिया ॥ २ ॥ सदानंद झाला विनविता ॥ करा करा समाजाची ऐक्यता ॥ संसार द्वेष सारा परता ॥ विद्येसाठीं बाळांच्या ॥ समाज० ॥ ३ ॥

पद. ३९ वें.

(चाल. जगीं शूर वीर०)

जगीं धन्य वीर ते पहा ॥ असती, जगतीं, दिनांस, जीवन, गा ॥ धृ० ॥ समाज बाळा विद्यादाना घेऊनि पदरीं प्रेमें तयांस, सुखदे, जावो, राहो, जीवित, परि तरी न सरे मागें जो हा ॥१॥

पद. ४० वें.

(चा. मृडतनयाते०)

तया नर वीरा पाहूं चला ॥ पाहूं चला हो पाहूं चला ॥ धृ० ॥ विद्यार्थ्यांसी नयनीं बघुनी ॥ प्रेम उचंबळे ज्या हृदयाला ॥ १ ॥ स्वपुत्रावरी प्रेम करी जे तैसें करी जो विद्यार्थ्याला ॥ २ ॥ स्व पर हस्तें द्रव्य

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रूपानें आश्रय देई त्या बाळाला ॥ ३ ॥ ईश्वर त्यासी दीर्घायु दे अखंड लक्ष्मी नांदो तयाला ॥ ४ ॥ सदानंद हा प्रेमें नमीतो ॥ गुरुरूप मानुनी त्या प्राण्यांला ॥ ५ ॥

पद. ४१ वें.

(चा. आज मी ब्रह्म पा०)

शंकर सांगें गौरीला ॥ धृ० ॥ सर्व दानाचे सार मी कथितो ॥ थोर महत्व ज्याला ॥ १ ॥ अन्न-दान तें श्रेष्ठ कीं म्हणती ॥ चारप्रहर दे देहासि शांती ॥ म्हणोनि विद्यादाना पुढती ॥ थोरवि नच त्याला ॥२॥ सुवर्ण घोडे देता हत्ती ॥ तरी तयासी चौर्य भीती ॥ विद्या देता द्विगुणित होती ॥ सुख दे त्यांचे वंशाला ॥ ३ ॥ म्हणूनि बाळां विद्यादेतां ॥ कोटि यज्ञाचें फळ ये हाता ॥ सदानंद हा झाला विनविता ॥ दात्यांच्या चरणाला ॥ ४ ॥

पद. ४२ वें.

(चा. लाल शाल जोडि०)

लावा लावा ही गोडी ॥ स्वधर्म पुस्तक पहा-ण्याची ॥ धृ० ॥ आपुल्या बाळां बोध करुनी ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विद्यालयीं हो जाण्याची ॥ १ ॥ नको नाटकें आणि सिनेमा ॥ संवय नको नट पहाण्याची ॥ २ ॥ पुराण अथवा कीर्तन श्रवणें ॥ नको नको परधर्माचीं ॥ ३ ॥ कादंबरी पुस्तकें वाचणें ॥ हातीं नको शृंगारांची ॥४॥ दुर्व्यसनाची नको संगती ॥ आवडि लावा सत्याची ॥ ५ ॥ उच्चशिक्षणा देऊनि त्यांना ॥ मदतकरा कीं, द्रव्याची ॥ ६ ॥ सदानंद हा सांगे समाजा ॥ युक्ति उन्नती होण्याची ॥ ७ ॥

पद. ४३ वें.

(चा. ऋतु आव०)

ध्यानीं मनीं सदा ठेवा बोलणें हो आमुचें ॥ होईल सत्य सत्य कल्याण हो तुमचें ॥ धृ० ॥ कशाला ते माणिक मोती दागिने सोन्याचे ॥ घाला घाला आपुल्या हो बाळा भूषण विद्येचें ॥ १ ॥ न शोभेचि विद्याहीना रेशमी जरीचे ॥ साध्या पोषाखांत शोभे गुण विद्वानाचे ॥ २ ॥ विद्याहीन केलें बाळा हमाल जन्माचे ॥ नवनीत सम हृदय केलें पाषाणाचें ॥ ३ ॥ सदानंद पायधरी प्रेमें समाजाचे ॥ आपुल्या बाळा विद्या द्याहो मागणें तयाचें ॥ ४ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ४४ वें.

(चा, वंजारा०)

बघुनि त्या अविद्या बाळा ॥ येतसे मनीं प्रेमाळा ॥ धृ० ॥ पहा कर्म तयाचें कसले ॥ पशुमागें धांवता थकलें ॥ पायीं कंटक त्याच्या घुसले ॥ पाऊलें रक्त वंबाळा ॥ येतसे० ॥ १ ॥ जरा व्यापाराकडे पहाना ॥ बाळापाठि लावी दुकाना ॥ हमाल बनविले त्यांना ॥ गेला गेला कमरेचा चाळा ॥ २ ॥ ऐशा त्या निर्दयी जनका ॥ सुजन हो तोंडा वरी थुंका ॥ न च विद्या शिकवी बालका ॥ चांडाळें कापिला गळा ॥ ३ ॥

पद ४५ वें.

(चाल. मित्राममम.)

पुत्राचा तात नव्हे शत्रु तो खरा ॥ विद्या ज्ञान बालांतें देईना जरा ॥ बाळपणीं डोहीं बुडवी, तात तो बरा ॥ असिल्लतें कंठनाळ, छेदि चरचरा ॥ पुत्राचें मांस भक्षि तात तो बरा ॥ परि पुत्रा जो अभ्यासीना, दुष्ट तो खरा ॥ १ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ४६ वें.

(चा. वसंती०)

विद्येचे महत्व आणा ध्यानीं ॥ देवादिकां जी अलभ्यवस्तु ये विद्वाना भुवनीं ॥ धृ० ॥ विद्येची अघटित हो करणी ॥ विद्येला जी असाध्य वस्तु, नाहींच त्रिभुवनीं ॥ १ ॥ सध्या अवलोका नयनीं ॥ आंग्ल अमेरिका जर्मन यांची देवा सम करणी ॥ २ ॥ मृत्तिका गात असें गाणीं ॥ स्वसामर्थ्यें नोकर केलें जल आणि हो अग्नी ॥ ३ ॥ विमानें ऐकिलिं पुराणीं सध्या जन हें वसती तयावरी पहा पहा नयनीं ॥ ४ ॥ आमच्या भरत भूचि कहाणी ॥ उगीच मुखानें वडवड करिती शहाणे शहाणे म्हणुनी ॥ ५ ॥ बंधुनो ऐका हो वाणी ॥ अप्रतिष्ठा होत आपुली विद्या हिन म्हणुनी ॥ ६ ॥ अंधकसें होतां तुम्ही बघुनी ॥ या विद्यार्थ्यां आश्रय प्रेमें, फंड जमा करूनी ॥ ७ ॥ सदानंद सांगतसे कानीं ॥ विद्येसम हो जगतीं त्राता नाहीं नाहीं कोणीं ॥ ८ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ४७ वें.

(चाल. च्छुकड़)

नाहीं विद्या ज्याला ॥ पशु म्हणावे की त्याला ॥ धृ० ॥ पहा पशूकडें, कामा येती हाडें ॥ कातड्याचे जोडे ॥ करुनि रक्षी मानवाला ॥१॥ गायी दूध देती ॥ बैल ओझें वहाती ॥ पोटा कडवा खाती ॥ उपकार त्यांचा जगताला ॥२॥ मनुष्य मृत्यु झाला ॥ कोणी शिवेना त्याला॥नाहीं कामा आला ॥ खरोखरी वाया गेला ॥३॥ विद्या शिकाल जरी ॥ जगीं तुमची थोरी ॥ होईल वाहवा सारी ॥ व्हाल प्रिय ईश्वराला ॥ ४ ॥ कांहीं लज्जा पाळा ॥ सोडा अन्य चाळा ॥ शिकवा विद्या-बाळा प्रेम सदानंदाला ॥ ५ ॥

पद. ४८ वें.

(चा. दत्तदिगंबर०)

तो बाप नव्हे बाळांचा ॥ वैरी कीं पूर्व जन्मीचा ॥ धृ० ॥ जन्मा देऊनि लाड पुरविला ॥ खाणें पिणें कपड्यांचा ॥ विद्या दाना नाहीं केलें, हमालकी जन्माचा ॥ १ ॥ बालपणांतचि लग्न केलें, इष्टमित्र मिळवोनी ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मन माने तें धन उडविलें, ।। विद्या न आणी ध्यानीं ।। २।। नट पहाण्यासी घेऊनि जातो, लाडकरी बाळाचा ।। विद्या शिकविणें मानसीं नाणी, शिरोमणी मूर्खांचा ।। ३ ।। जगासि सांगे कष्ट मी केलें, पुत्राच्या हो काजा ।। विद्वाना पाहुनि बालक बोले ।। गळा कापिला माझा ।। ४ ।। सदानंद हा सांगे सर्वां विद्या शिकवा बाळां ।। विद्ये वांचुनि बालक ठेवी त्या शिवूं नका चांडाळा ।। ५ ।।

पद. ४९ वें.

(चाल. माडिच्या ग०)

विद्याधन श्रेष्ठ आहे या त्रिभूवनीं ।। म्हणुनी विद्या प्राप्तकरा हीच विनवणी ।।धृ०।। भाऊबंद यासी कोणी न मागती वाटुनी ।। दुजियासि देता पहा होतसे दुणी ।। १ ।। चोर भय नाहीं यासी विचारा मनीं ।। परदेश गमनीं होत असे बंधु भगीनी ।। २ ।। नका हो बाळां शोभा आणुं सोनें घालुनी ।। शृंगारकरा त्यासी प्रेमें विद्याभूषणी ।। ३ ।। सदानंद सांगतसे ठेवा हो ध्यानीं ।। विद्याहीन नीच असे गाढवाहुनी ।। ४ ।।

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ५० वें.

(चा. उद्यावद्य जाते०)

विनति सकलांते विनति सकलांते ॥ या विद्या दान बालांते ॥धृ०॥देता विद्यादान बालांला ॥ येईल हो श्रेष्ठपणा धर्माला ॥ मग उणें नाहीं द्रव्याला ॥ येईल भरते३ ॥ आनंदाचे खरोखर पुरते॥ १ ॥ पहा पहा अन्य बंधूला ॥ विद्येनें पुढती गेला ॥ तुम्ही मागें रेंगत बसलां ॥ पाहुनी यातें३ ॥ दुःख होत सदानंदातें ॥ २ ॥

पद. ५१ वें.

(चा. रमते रमते०)

प्यारे प्यारे मजा, विद्या माता भजा ॥ धृ० ॥ विद्यामाता प्रसन्न होतां ॥ सहज लक्ष्मी येईल हातां ॥ तीस विसरूनि जातां ॥ शिमगा समजा ॥ १ ॥ जरी पाहिजे कैलास ॥ विद्यालयीं करा वास ॥ त्याजितां विद्येच्या पदास ॥ नरक समजा ॥ २ ॥ विद्येनेंचि ब्रह्मज्ञान ॥ विद्येनेंचि मनुष्यपण ॥ न शिकता विद्या जाण ॥ पशु समजा ॥ ३ ॥ विद्येनेंचि न्याय नीति ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विद्येनेंचि यशप्राप्ति ॥ विद्याधन नसता हाती ॥ दुर्गती समजा ॥ ४ ॥ विद्येनेंचि हो आनंद ॥ विद्येनेंचि ब्रह्मानंद ॥ विद्येनेंचि सदानंद ॥ प्राप्त समजा ॥ ५ ॥

पद. ५२ वें.

(चा. धनराशी०)

करुनि सुविचारा ॥ कार्याकरा ॥ धैर्याधरा ॥ ॥ धृ० ॥ गेला गेला धर्म लयाला ॥ कित्येक मिळाले परधर्माला ॥ आतां पहा, काळ कठिण, चाला जपुन ॥ करा विद्यच्या प्रसारा ॥ १ ॥

पद. ५३ वें.

(चाल. दूति नसे ही माला०)

विनंति हो सकलाला ॥ भारतीय बंधूला ॥धृ०॥ सोडा सोडा मनिची विषमता ॥ करा करा सर्वांची ऐक्यता ॥ विद्यादान द्या बालां ॥ १ ॥ दुर्जनासी प्रेमें बोधा ॥ समाज कार्या सत्वरि साधा ॥ कोपूं नका कोणाला ॥२॥ हीन स्थिती ही कितितरी आली ॥ कोणी उरला नाहीं वाली ॥ पुसती कोणी न विद्येला ॥ ३ ॥ आदि विद्या कीं संपादा ॥ नंतर बरवा दुसरा धंदा ॥ मग आनंद सदानंदाला ॥ ४ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ५४ वें.

(चा. क्यापडा चट०)

विनंती तुम्हा सर्वांना ऐका सज्जन ॥ आम्रुचा कापिला गळा जन्म देऊन ॥ १ ॥ बाळपणीं लाविती आम्हां घरांतील धंदा ॥ विद्या न शिकवितां केलें गुलाम की बंदा ॥ २ ॥ नका करूं कठिण हृदय पहा चहूंकडे ॥ विद्वाना पाहुनी आम्हा कोसळे रडें ॥ ३ ॥ पहा मिळे राजसभेंत विद्वाना मान ॥ विद्याहीन तेथें जातां पुसती कोण ॥४॥ या साठीं शिकवा विद्या आम्हां बाळाला ॥ मग येईल कीं श्रेष्ठत्व तुम्हा सकळांला ॥ ५ ॥ सदानंदाचि ऐका वाणी ध्यानीं मनीं ठेवा ॥ शिकवूनि बाळासी विद्या धन्यतां मिळवा ॥ ६ ॥

पद. ५५ वें.

(चाल. सांगन०)

नसता विद्यामाता हातीं ॥ कशी हो जाइल साडेसाती ॥ धृ० ॥ दुजे निंदीता ऐकुनि घेता, धरिता साधुवृत्ती ॥ कशी हो जाईल साडेसाती ॥ १ ॥ आप-

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आपणा मध्यें भांडण करिता ॥ दाविता तेथें वडती ॥ कशी० ॥ २ ॥ भोंदू मागता घर त्यां देता॥ विद्यार्थ्यां न मिळेचि वस्ति ॥ कशी० ॥ ३ ॥ वाळें दुकांनीं करिता शहाणी ॥ ना तरी घरकामें करिती ॥ कशी० ॥ ४ ॥ सदानंदा दुःखचि होतें ॥ शिकवा विद्या कि हो पुरती ॥ मग हो जाईल साडेसाती ॥ ५ ॥

पद. ५६ वें.

(चा. क्यापड़ा चट०)

समाजासि करितो विनंती अतिप्रीतीनें ॥ वाळासि शिकवा विद्या नको दागीनें ॥ १ ॥ वहुतची घालुनी दागिनें वाळ तुम्हीं सजवा ॥ परी विद्वान सूर्यापुढें दिसे काजवा ॥ २ ॥ रेशमाचा घातला कोट जरीरुमाल ॥ विद्वाना पुढती जातां दिसे हमाल ॥ ३ ॥ ज्याकिटासि लावुनी घड्याळ सजाविला खूप ॥ सभेंमाजीं जातां त्यासी होय थरकांप ॥ ४ ॥ या साठीं नको दागिनें विद्या तुम्हीं शिकवा ॥ तेंच होय तया भूषण ऐशा परी सजवा ॥ ५ ॥ सदानंद मागतसें तुम्हा हेंचि हो दान ॥ देऊनी वाळासी विद्या व्हावे जगीं धन्य ॥ ६ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ५७ वें.

(चा. लाल शाल जोड़ि.)

काल बाल वय नये परतोनी ॥ करा विवेका तुम्ही स्वमनीं ॥ धृ० ॥ कंटकमय हें जीवित जाते, विद्ये वांचोनि या अवनीं ॥ साक्ष आतां ती किती तरी द्यावी, पहातां जरी तुम्हीं नयनीं ॥ १ ॥ समाज बांधव पुढें चालले, विद्यालंकारें सजुनी ॥ तीच लालसा आहे आम्हांला, तृप्त करा तुम्ही पुरवोनी ॥ २ ॥ जन्म देऊनीं जगीं वाढविलें, भूषण त्याचें मानोनी ॥ विद्या-हिन ते कां मग करितां, टाका कंठा छेदोनी ॥ ३ ॥ बापू तनय हा विनवी समाजा, बाळां सजवा विद्येनीं ॥ जगीं धन्यता होईल तुमची, सार्थक जन्मा येऊनी ॥ ४ ॥

पद. ५८ वें.

(चा. प्रभवेक जय गुरुवर्या.)

येऊद्या करुणा बाळांची ॥ विद्यादान देण्याची ॥ धृ० ॥ दैन्य आमुचे किती तरी वग्रतां ॥ काळ लागला पाठी पुरता ॥ आशा नुरली सौख्याची ॥१॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असें काय आम्ही पापचि केलें ।। किंवा आमुचें नशिबचि फुटलें, साह्यता नसे विद्येची ।। २ ।। बाळपणीं घरकाम लावितां ॥ विद्येचि कोणी न च करी चिंता ।। वरि वरि भाषा ममतेची ।। ३ ।। विद्यार्थीजन भिक मागती ।। भोंदू फसवे चैन उडविती ।। हीच रीत कां हो तुमची ।। ४ ।। आतां तरी आम्हा विद्या शिकवा ।। ना तरी आमचा कंठ चिरावा ।। धन्यता गाऊं मग तुमची ।। ५ ।। आश्रय आदि द्या विद्यार्थ्याला ।। द्रव्य साह्यता करा तयाला ।। प्रार्थना सदानंदाची ।। ६ ।।

पद. ५९ वें.

(चाल. नृप ममता.)

विद्या नाहीं ज्या प्राण्याला ॥ तो फुकटचि वाया गेला ।। खचितचि० ।। १ ।। जिवंत प्रेत म्हणावे त्याला ।। कष्टविले तेणें मातेला ।। खचि० ।। २ ।। चा० ।। कुणि देति तयासि न मान, करिति अपमान ।। पशुहुनी हीन ।। लेखिती त्याला२ ।। म्हणुनी विद्या द्या बालां ।। खचि० ।। ३ ।। तुम्ही त्यांसी जन्म कां दिधला ॥ पुनरपि घात करूं सजला ॥ खचि० ।। ४ ।।

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सोन्यानें त्यासि मडविला ॥ लोभानें दावा साधिला ॥ खचि० ॥५॥ चाल० ॥ अशा परी दावुनी लळा ॥ करुनि हिनकळा ॥ कापिला गळा ॥ घात तुम्ही केला २ ॥ दुःख होत सदानंदाला ॥ खचि० ॥ ६ ॥

पद. ६० वें.

(चा. चंद्रकांत०)

ऐका सुजन हो विद्या हिनाची गती बरी नाहीं। यम तयासी लोटितसे कीं, नरकाच्या डोहीं ॥ १ ॥ ह्या लोकीं हो मान तयासी कुठें मिळत नाहीं ॥ संसारामध्यें सुख शांती ही नसे तया कांहीं ॥ २ ॥ कष्ट करोनी शिणतो दुजा गर्धभचि जाणा ॥ भोंदू फसवे चैन उडविती लुटुनिया त्यांना ॥ ३ ॥ ऐशी दुर्दशा करण्या बाळां जन्म कां हो दिधला ॥ याहुनी त्यांचा प्राणघेतां तरी सुख होते त्याला ॥ ४ ॥ नका हो बाळा दुःखीं लोटु जन्मा देऊनी ॥ नका करूं हो ऐशी त्यांच्या जन्माची हानी ॥ ५ ॥ इह पर लोकीं सुखी करा हो विद्या शिकवोनी ॥ सदानंद हा विनवी समाजा करजोडुनि दोन्हीं ॥ ६ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ६१ वें.

(चा. जरा थांब थांव.)

छान छान छान विद्या लाभ देते भारी छान ॥ ॥धृ०॥ शिकण्यासी वाटे जड ॥ परी पुरविते कोड ॥ ज्ञानाची असे खाण खाण खाण ॥ वि० ॥ १ ॥ किती सांगू तिची थोरी ॥ दारिद्र्यासी दूर करी ॥ जगीं मिळे बहु मान मान मान ॥ विद्या० ॥ २ ॥ सदानंद मारी हांका ॥ सर्व जन विद्या शीका ॥ धरा तीचें सदा ध्यान ध्यान ध्यान ॥ वि० ॥ ३ ॥

पद. ६२ वें.

(चाल. गेले दिन हे०)

असे कसे तुम्ही घोरत पडला उठा उठा सावध व्हा हो ॥ विद्यामातेचें साह्य घेऊनि दुर्दैन्यासी पिटवा हो ॥ १ ॥ समाज वाळां साह्य करूनी उच्च शिक्षणा त्यां द्या हो ॥ सुखोपभोगा भोगुनि त्या सह जगीं धन्यता मिळवा हो ॥ २ ॥ सर्व जग हें मानुनी आपलें विद्यालक्ष्मी त्या द्या हो ॥ आपणच आपलें हीत करावें नीचवृत्ति ही सोडा हो ॥ ३ ॥ सर्व सागजी

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बोध करूनी शिवभक्ति त्या लावा हो ॥ सदानंद हा विनवी सर्वां दुष्टवासना सोडा हो ॥ ४ ॥

पद. ६३ वें.

(चा. जाईल झोक.)

नरदेह असा अमोल, विद्ये वांचुनी होईल फोल ॥ धृ० ॥ चा० ॥ नरदेहांतचि सर्वसाधनें ॥ लिंगांगासी समरस होणे ॥ इहपरलोकीं सौख्य घेणें ॥ चौऱ्यांशीची तुटती बंधनें ॥ शंकर आपला करूनि घेणें ॥ अथवा शंकर आपणची होणें ॥ महावाक्याचे बोल ॥ विद्येवांचुनी० ॥ १ ॥ विद्येस्तव नरजन्म दीधला ॥ तोही तुम्ही फुकट दवडिला ॥ संसारामध्यें निमग्न झाला ॥ तैसेचि करितां आपुल्या बाळां ॥ विद्येवांचुनी हमाल केला ॥ त्यासी लाविता घर कामाला ॥ देता नशीबा बोल ॥ वि० ॥ २ ॥ अविद्येची पडली भूली ॥ जगांतसारी छीः थू झाली ॥ मनांत मानितां ख्याली खुषाली ॥ ओझें वाहतां टक्कल पडली ॥ विद्यार्थ्यांसी कोणी न वाली ॥ गुरुजनासी निद्रा लागली ॥ रिकामे ऐटिचे बोल ॥ विद्ये० ॥ ३ ॥ आतां तरी पुढें सावध

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

न्हारे ।। उच्च शिक्षणा बाळां द्यारे ॥ द्रव्य साह्यता त्यांसी करारे ।। भोंदू फसवे हांकलुनि द्यारे ।। जगीं धन्यता मिळवुनी घ्यारे ।। जन्म सार्थक तुम्ही करारे ॥ सदानंदाचे बोल ।। हे सारे सत्य अति अमोल ।। ४ ।।

प्रश्नोत्तर पदें.

पद. ६४ वें.

(चा. हरिची भगिनी.)

काय सांगसी कशाची विद्या पुसतो कोण त्यारे विद्येला ।। दो पैशावर लिहिणार येतो, कुणी न पुसती मग त्याला ।। वतन दाराची वाळे आम्हीं लयी उत्पन्न हाय आम्हाला ।। सरकारांतून पैसा येतो बसूनशानी खायाला ।। १ ।। मी रे जातिनें पाटीळ हायरे पांडेपण माझ्या भावाला ।। एकजण तर सावकारी करितो कशाला विद्या आम्हांला ।। आमच्या बिगर पान हालना सारागांव माझ्या सेवला ।। हात्तीवानीं पन्नास-बैल चालत्याती आमच्या औताला ।। २ ।।

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ६५ वें.

(चा. हरिची भगिनी.)

उत्तर

कुणाचा पाटील कुणाचा पांड्या, पुसतो कोण तुझ्या वतनाला ॥ गुराख्या इतका पगार मिळेना लागलास बडाई झोकायला ॥ सही पुरत तरी लिहन पाहिजे, पैका मिळेल मग तुजला ॥ विद्ये विगर कांही चालेना, मान असे बा विद्येला ॥ १ ॥

पद. ६६ वें.

(चा. भलाजन्म.)

विद्यार्थ्यांचा करुणारव हा ऐकुनि माझे मनीं ॥ वाटते विद्याहिन नको जनीं ॥ १ ॥ हृदया माझ्या धक्का बसला येत कंठ दाटुनी ॥ नेत्र ते भरले असे आश्रुनीं ॥ २ ॥ यथा शक्ति मी मदत करीतो, स्विकार त्याचा झणीं ॥ करा हो राचालिंग महामुनीं ॥ ३ ॥ बापूसुत हा विनवी समाजा, बाळें आलें चालुनी ॥ साह्य तुम्ही करा मना पासुनी ॥ ४ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ६७ वें.

(चा. मजा देते हैं.)

नका वेळ घालवुं वाया ॥ पडतो मी तुमच्या पाया ॥ धृ० ॥ शेवटची विनंती ऐका ॥ विद्ये वांचुनि राहूं नका ॥ अंति बसेल मोठा धक्का ॥ जन्म हा जाईल वाया ॥ १ ॥ विद्येनें सर्व कांहीं ॥ मोक्ष ही मिळतो पाही ॥ असा अपूर्व फायदा होई ॥ सर्व सुखे मिळती भोगाया ॥ २ ॥ कोटीद्रव्य देता पाही ॥ लवमात्र मिळणें नाहीं ॥ ऐसे आयुष्य अमोल पाही ॥ लागला काळ हा खाया ॥ ३ ॥ विद्ये साठीं आयुष्य झिजवा ॥ अधर्म जगांतुन पळवा ॥ सत्कीर्ति मागें उरवा ॥ सुखी करा सदानंदा या ॥ ४ ॥

पद ६८ वें.

(चा. रमारमण हरि.)

जय जय पंचाचार्य गुरुवृंद ॥ धृ० ॥ वीरशैव मत स्थापन करुनी ॥ उद्धरिले गणवृंद ॥ १ ॥ सेवा करिती नित्यचिं तुमची ॥ त्रिसहस्र चरवृंद ॥ २ ॥ सुरनर मुनिजन स्तोत्रें गाती ॥ तुटावया भवबंध ॥ ३ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कीर्ति गातां शेषही शिणला ।। मी वर्णूं किती मतिमंद ।।४।।
पदकमलावरी भ्रमरन्यायपरि ।। मोहित हा सदानंद ।।५।।

गुरुभक्त सदानंदबुवा कीर्तनकारकृत पदें

समाप्त.

पद. ६९ वें

(चाल. जयगुरु महन्त)

जय गुरुवरेण्य रेणुकदेव ।। ज ।। भयहर योगि विराड्विमल गुरु० ।। नरवर श्रीद । परम विनोद ।। दुरित हरण करुणा निधे गुरु० ।। १ ।। जगदवनघन । गगन प्रयाण ।। विगत भोग राग, जगद्गुरु० ।। २ ।। कुम्भजमुनि हृद । याम्भोरुहलस ।। दम्भोरुहपाद ।। परमगुरु० ।। ३ ।। शिवमतवीर । भविमतदूर ।। कविकुलकल्पतरो । जगद्गुरु० ।।४।। मदनहरास्यज । विदलितदनुजा ।। मुदितचिदिरमठ वंशज । गुरु० ।।५।।

(चिद्रिमठीय वीरभद्रशर्मकविकृत)

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ७० वें.

(चा. वाल मुवा छोटी)

श्रीवरदाचार्य-दारुकाधीश-भजकाधारक ॥ प ॥
दूरदुरित-सुमहिमागार विनतोद्धारक । पारनिगमान्त-प्रथमताचार ममतावारक धीर-शरणागतसुखद ॥ १ ॥
सेव्य भव्यान्वय सुख श्राव्य चरिता शोभित । नव्यमधुरालाप-यमिसंभाव्यतेजोराजित दिव्यवृन्दार्चित सुपद ॥ २ ॥
वेदवादाविकलितानादि सकला वेदका । भेद-हृदयालय सुजनतामोदघनतापादक । पादाविनत वृषभलिंग ॥ ३ ॥

वृषभलिङ्ग शिवाचार्य—गोंब्बूर

पद ७१ वें.

(चा. गजल०)

जय रेणुकगुरुवरदेवा, मय दावसुजन संजीव ॥ धृ० ॥ पतितौघ पवित्रकृदाशा, तति विस्तृतचारित-निराशा ॥ गतिकाद्दतिसम्मत धीश ॥ श्रुतिमान्यसुखार्थ

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सुकोश ॥ १ ॥ सुमशायकशात्रवलीला । रममाण विरक्ति विशाला समकामित वितरणशील । यामि मानसकंज-विलोल ॥ २ ॥ विततान्वयराजसमाजा । नतपावन-यादपयोजा । श्रितरक्षक भूसुरभूज । नुतिसंमुख वृष-मतिबीज ॥ ३ ॥

(वृषभलिंग शिवाचार्य गोव्वूर)

श्रीशंभुलिंग स्वामींनीं केलेली पदें.

पद. ७२ वें.

(चाल. पांडुनृपति०)

पाहि सदय हृदय गुरु । मोह महीधरेश्वरु ॥ शिष्यनिचय सुमनसतरु । योगिनायक ॥ १ ॥ ब्रह्म विष्णु रुद्ररूप । ब्रह्मविद्वरिष्ठभूप ॥ निर्गत संसार ताप ज्ञान बोधक ॥ २ ॥ द्वैतवादिजनभुजंग । पूत महेशां-तरंग । देशिकेन्द्र शंभुलिंग । मोक्षदायक ॥३॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ७३ वें.

(चा. गिरीश पाहि सदा०)

महेश पाहि शिव । त्रिपुरहर । महीधरेन्द्र सुताधव । व्योमकचाभिराम, निकाम । कालारि फालाक्ष ॥ १ ॥ वृषभ तुरंग, विधृत कुरंग । चिच्छक्तिवामांग ॥ २ ॥ दुरितविनाश, वरगुणकोश । गुरु-शंभुलिंगेश ॥ ३ ॥

पद. ७४ वें.

(चा. कधि करिसी०)

स्मरनाश व्योमेकश, परमेश पालय । भीषण नागभूषण । विजितवारण । विरहितेषण । दयाकर शंभो ॥ १ ॥ दारुण यमविदारण । विश्वकारण, शैलचारण । रमाधव वाण ॥ २ ॥ देशिक भक्तपोषक, पापनाशक । योगिनायक निरामय देव ॥ ३ ॥

पद. ७५ वें.

(चा. धनराशी०)

जय गौरीरमण । देवाधीश । विमलामर-तटिनीधर ॥ भक्ताहिता । सदयाकटाक्ष । कामितदाता ।

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सोमचूड ।। चर्मांबरधर परमेश । धनपतिसख । मदन-शमन ।। १ ।। सत्य चिदानन्दा संग । नित्य निरीह शंभुलिंग ।। वेदागमनुतचरणाब्ज । निरुपम । निरावरण । शरण ।। २ ।।

पद. ७६ वें.

(चा. घेऊनि ये पंखा०)

पालय सोमधर । दुरितहर । शंभो पार्वतीश्वर ।। मुनिजन नुतिलोल । विनमित सुरजाल । जितकाल, श्रुतिमूल ।। १ ।। हरिविधि सुरगेय । सुरुचिर चिर-काय । हृतमाया । निरपाय ।। २ ।। वासवसुतपोष । देशिककृततोष । फणिभूष । गतरोग ।। ३ ।।

पद. ७७ वें.

(चा. वहुतेरा समझा०)

जय शंभो शिव भूतेश-सोमधर ।। ततगुण भरण रतिपति हरण । हतबलनतचरण नुत कात्ययनीरमण ।। १ ।। बंधुरगुणसं-बंधदयाकर । सिन्धुराजिनवसन-नन्दिकेश्वरवाह ।। २ ।। भृंगिनटनाप्रिय-तुंगनिगमहृय । मंगलात्मकशंभु-लिंगदेशिकराज ।। ३ ।।

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पद. ७८ वें.

(चा. गिरिजेशभद्रं०)

पाहि पाहि सद्गुरुराज, चरणावनतजनसुरभूज ॥ भवरोगवारिधिभैत्र । शिवयोगिजनवनचैत्र । शिवबोध दायक शुभगात्र ॥ १ ॥ शितिकंठ तंत्रजाल प्रतिपाद्य पावनशील । जितकाल सन्नुत श्रुतिमूल ॥ २ ॥ दुरितौघकाननदाव । स्थिर मोक्ष लक्ष्मी जीव । वरशंभुलिंग चरदेव ॥ ३ ॥

पद. ७९ वें.

भज भज मानस निजगुरु चरणं । त्यज त्यज मिथ्यासंस्टति स्मरणं ॥ १ ॥ वरसच्चित्सुखनित्याखंडं । परिभवसागरतरण तरंडं ॥ २ ॥ नश्वर माया तिमिर पतंगं । शश्वत्संयमि जनततिसंगं ॥ ३ ॥ दुष्टानंगमदेभमृगेंद्रं । श्रेष्ठशैवमतवारिधिचंद्रं ॥ ४ ॥ त्र्यंबकभक्तजनौघतरण्यं । शंभुलिंगशिवयोगिवरेण्यं ॥ ५ ॥

पद. ८० वें.

(चा. वरनन०)

हरिविधिसुरपति विनतपादजय । गौरीवामांग

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिव । नागाधिपभूषण ॥ कालकाल, भवपाथोनिधि-तारण ॥ १ ॥ पुरहर, परतर, सुरगिरिचाप । विजित मनसिज । देशिक शंभुलिंग । निगमनिकरनुत । देव-तटिनीधर ॥ २ ॥

पादस्तवनं ८१ वें.

(चा. यन्नरक्षिसुवंद०)

पाहि मां गुरुपाद पाहि मां शिवपाद । पाहि मां चरपाद–पाहि सततं ॥धृ०॥ सत्य चित्सुखपूर्ण निर्गुण निरावरण । नित्य निरुपम निरालंब पाद ॥ अत्यधिक सद्गुरुमेव, नगुरोरधिक । मित्यादि श्रुतिनिचयस्तुत्य पाद ॥ १ ॥ स्थापयति पाणिमंत्रं पवित्रं च । रुद्रयत्ते-जानिम चारुचित्रं । वेदप्रतिपाद्य शिवलिंग स्वरूपेण । साधकैरर्चितोत्कृष्ट पाद ॥ २ ॥ ईश्वरो तिथिरेव चरति तमुपास्महे । भूरुद्र जंगमात्मने नमस्ते ॥ इति निगम शैवागमादिभिर्नुतपाद । यति शंभुलिंग हृन्निलय पाद ॥३॥

इति श्रीशंभुलिंगस्वामीकृत पदें

समाप्त.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्येभ्यो नमः



नागनूर बृहन्मठाध्यक्ष

पं० काशीनाथशास्त्री, काव्यतीर्थ.

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्य प्रासादिक प्रबंधमाला.

		किं०
प्रथम पुष्प संक्षिप्त शिवपूजाविधिः	...	०-१-०
द्वितीय पुष्प वीरशैवाचारविधिः	...	०-२-०
तृतीय पुष्प पाळणे संग्रह ...	... ...	०-१-०
चतुर्थ पुष्प सद्बोध पद्यावलि	... ...	०-२-०
पंचम पुष्प श्रीमज्जगद्गुरुपंचाचार्याष्टोत्तरशत नामावलिः ...	... ...	०-२-०
षष्ठ पुष्प रेणुकविजयः	... ...	१-०-०

पुस्तकें मिळण्याचा पत्ता:—

श्रीयुत सांबप्पा ब्याळे जोडजळेकर

यांचे दुकानीं, पोष्ट लातूर.

अथवा जंगमवाडीमठ, बनारस येथें,

प्रकाशकाकडे मिळतील.

६६५५ a

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri